**मानव विकास कार्यक्रम सन २०२३-२४ ते २०२५-२६ या आर्थिक वर्षात पुढे चालु ठेवण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## नियोजन विभाग
**शासन निर्णय क्रमांक : माविका-२०२२/प्र.क्र.४१/का.१४१८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०२२.

**वाचा :**

१. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. माविमि-२०१०/प्र.क्र.८१/का.१४१८, दि.१९.०७.२०११.
२. नियोजन विभागाचे पत्र क्र. माविका-२०१४/प्र.क्र.३५/का.१४१८, दि.२३.०२.२०१७.
३. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. माविका-२०१४/प्र.क्र.३५/का.१४१८, दि.११.०३.२०२०

**प्रस्तावना :**

नियोजन विभागाच्या दिनांक दि.१९.०७.२०११ च्या शासन निर्णयान्वये सन २०११-१२ पासून मानव विकास कार्यक्रम अंतर्गत राज्यातील २३ जिल्ह्यांत निवडलेल्या १२५ अतिमागास तालुक्यांत “(i) आरोग्य, (ii) शिक्षण व (iii) उत्पन्नवाढ” या ३ क्षेत्रांशी संबंधित विविध योजना राज्य व जिल्हा/तालुका स्तरावर राबविण्यात येत आहेत.

२. नियोजन विभाग शासन निर्णय क्र. माविका-२०१४/प्र.क्र.३५/का.१४१८, दि.११.०३.२०२० अन्वये “मानव विकास कार्यक्रम” राज्यातील २३ जिल्ह्यांतील १२५ तालुक्यांत सन २०२२-२३ या वित्तीय वर्षापर्यंत पुढे चालू ठेवण्यास/राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

३. संयुक्त राष्ट्राकडून (U.N.D.P.) निर्धारीत करण्यात आलेले “शाश्वत विकासाचे ध्येय (Sustainable Development Goals)” सन २०३० पर्यंत साध्य करण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. संयुक्त राष्ट्राकडून (U.N.D.P.) निर्धारीत करण्यात आलेल्या शाश्वत विकासाच्या ध्येयांपैकी (Sustainable Development Goals) मानव विकास कार्यक्रमाशी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे “गरीबी निर्मूलन, भूक भागविणे-अन्न सुरक्षा व सुधारीत पोषण आहार, शिक्षण, आरोग्य आणि महिला व मुलींचे सक्षमीकरण” यासारखी काही ध्येये जोडली गेली आहेत. “मानव विकास कार्यक्रम” अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या माध्यमातून शाश्वत विकासाची उर्वरित ध्येये साध्य करण्यास हातभार लागणार आहे. राज्यातील निवडलेल्या १२५ अविकसित व मागास तालुक्यांमध्ये विविध योजना राबविल्यामुळे संबंधित तालुक्यांतील लोकांच्या “आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ” या ३

क्षेत्रांचा विकास दर वाढण्याच्या दृष्टीने चांगले परिणाम दिसून आलेले आहेत. सद्य:स्थितीत "मानव विकास कार्यक्रमा" ची मुदत दि.३१.०३.२०२३ रोजी संपुष्टात येत असल्याने; सदर कार्यक्रमास मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

"संयुक्त राष्ट्र (United Nations)" यांच्याकडून निर्धारीत करण्यात आलेली "शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals)" सन २०३० पर्यंत साध्य करण्याच्या उद्दिष्टपूर्तीकरीता व मानव विकास कार्यक्रम अंतर्गत विविध योजनांच्या माध्यमातून राज्यातील अतिमागास १२५ तालुक्यांचा व पर्यायाने संबंधित जिल्ह्यांचा "मानव विकास निर्देशांक" उंचावण्यासाठी "मानव विकास कार्यक्रम" दिनांक ३१ मार्च, २०२६ पर्यंत चालू ठेवण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सदर शासन निर्णय उपलब्ध करण्यात आला असून; त्याचा संगणक संकेतांक २०२२११२८१२४१०९२११६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJEEV HARISHCHANDRA DHURI

Digitally signed by SANJEEV HARISHCHANDRA DHURI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b2040f8afae5b15468c26cd79b1393381092c74fb3501bf565f466dec2136a36, pseudonym=457F70F5FA4DEA10E909A007981CEAF0F1C5A45D, serialNumber=F955ED89F98089D5B84355354FDE7CA14F577C3C2B384D076E46143888B1F5E7A, cn=SANJEEV HARISHCHANDRA DHURI
Date: 2022.11.28 12:43:52 +05'30'

**(सं. ह. धुरी)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री/राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. विरोधी पक्षनेता (विधान सभा / विधान परिषद), विधानभवन, मुंबई
६. मा. विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा /लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर, महाराष्ट्र १/२
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१०. प्रधान सचिव (नवि-२), नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
११. अपर मुख्य सचिव (परिवहन), गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

१२. प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र शासन, वरळी, मुंबई
१४. आयुक्त, मानव विकास, औरंगाबाद
१५. महासंचालक, यशदा, पुणे
१६. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
१७. जिल्हाधिकारी (सर्व)
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१९. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२०. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१. उप आयुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व)
२२. जिल्हा नियोजन अधिकारी (मानव विकास), जिल्हा मानव विकास समिती (संबंधित २३ जिल्हे)
२३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (संबधित तालुके)
२४. मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद (संबंधित)
२५. मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व)
२६. सह सचिव/ उपसचिव (सर्व), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. निवड नस्ती.